# Delaware Valley Marathi Mitra Mandal (DVMMM)

## Makarsankrant: January 15th 2011

आपल्या देशातील सण किती ऋतू प्रमाणे साजरे केले जातात. अगदी वैज्ञानिक आधार घेऊन. जानेवारी महिन्यातली संक्रांत असते थंडीला सामना करण्याकरिता. महिन्याच्या मध्याला भर थंडी असताना, कुमारीकाना सुगड देतात. त्यात उस, गाजर, बोरं, हरभरा, शेंगा, सगळे या मोसमात मिळणारे उष्ण पदार्थ भरतात.सुगड मातीचे , धरणी मातेशी नाते सांगणारे. तीळ आणि गुळ दोन्हीही थंडीत उष्णता... उर्जा निर्माण करणारे. हलवा सुद्धा तिळावर साखरेचा काटा.

या वर्षी अमेरिकेत हे सर्व होणार कि नाही अशी थोडीशी चिंता हवामानाच्या ,बर्फाच्या वर्षावामुळेमनात होती. लेकीन मौसम भी हमारे साथ था!

हिम वर्षाव होणार होणार, सांगणाऱ्या हवामान ख्यात्याच्या अंदाजाला संक्रांत प्रेमी भारतीयांच्या उत्साहामुळे थोडे थांबावे लागले, आणि DVMM M ची संक्रांत झोकात पार पडली. हॉल मध्ये शिरल्या बरोबर प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र छान फुलांचे ग्रुप .गुलाब, मोगरा, जास्वंद, कमळ, लिली .अगदी प्रत्येक फुलाच्या आकर्षक चित्रासह. लहान मुलांसाठी वेगळी टेबले. त्यावर पतंग तयार करणे, तो उडवणे, असे छान छान खेळ सुरु होते.

मोठ्यांसाठी वेगळे खेळ. पहिला खेळ विषया प्रमाणे नाट्य अभिनय करणे. तसा प्रत्येकामध्ये एक कलाकार दडलेला असतोच. त्या प्रमाणे अगदी गावाकडची बस आपल्या कोंबड्या सह पोहचली तर TV वरील adv सकट व्यायाम शाळा आणि आरोग्यं धनसंपदा सांगणारे हास्य नाटकही तयार झाले.भारतातील वेगवेगळ्या प्रदेशातील गाणी, संगीत विद्यालयात साजरी करणारे अभिनय करणारे कुणी होते, तर अमेरिकेतील मुला-मुलींचे लग्नासाठी "बघणे" आणि स्त्री मुक्ती आणि पुरुष मुक्ती सांगणारे अभिनयहि कुणी सदर केले.

दुसऱ्या गेम मध्ये प्रत्येक गटातील दोघांनी समोर समोर खुर्चीवर बसायचे. प्रत्येकाकडे एक फुगा असणार. फुगा एका गटाने फुगवायचा आणि दुसरीकडे जाऊन खुर्चीवर फुग्यावर बसून फोडायचा.

तिसरा गेम अधिकच मजेशीर .एक box कार्ड बोर्ड चा. त्याला मध्यभागी आयताकृती खाच. त्यात पंधरा छोटे चेंडू. त्या बॉक्सला दोन्ही बाजूने दोरी. ती दोरी कमरेला बांधायची ..पाय जमिनीवरून न उचलता, कंबर हलवून चेंडू पाडायचे.हसून हसून पुरेवाट!

चौथा गेम गाण्याचा. चित्रपटातील नट नट्याच्या चीठीवरून dual गीत म्हणायचे. संपूर्ण ग्रुपने. मस्त मज्जा!

पाचवा गेम चित्रपटातील गीते म्हणायची. बाथरूम सिंगर्सनि पण गळा धुउन I mean to say , साफ करून घेतला! .

या सर्व खेळान पूर्वी, नवीन कमिटीचे स्वागत आणि जुन्या कमिटीला bye bye, trophi देऊन करण्यात आले. नवीन अध्यक्ष आशिष चौघुले यांनी नवीन वर्षाची, नवीन कमिटीने ठरवलेली उद्धीष्ठ सांगणारे आणि सर्वांचे सहकार्य मागणारे जोरदार भाषण केले .

हळदीकुंकू आणि कालनिर्णय कॅलेंडर लुटणे झाले .

गरम गरम गुळपोळी, साजूक तूप ,लोणचं,मसाले भात ,चटणी ,सामोसे आणि सॉस याचे जेवण झक्कास !

सर्वांशी गप्पा टप्पा करत सर्वांनी एकमेकांचा निरोप घेत कार्येक्रम संपला

आणि हो! मला आवडणारी... मराठी शाळेची Announcement हि करण्यात आली. खूपच छान वाटले!

लतिका

Email: latikasm@gmail.com